RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2013–15

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार–अ

वर्ष ६, अंक ५] गुरुवार, एप्रिल ३, २०१४/चैत्र १३, शके १९३६ [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक ५४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

विधी व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ मार्च २०१४.

अधिसूचना

कौटुंबिक न्यायालय कायदा, १९८४.

क्रमांक कौटुंन्या. १११४/प्र.क्र. ४४/का-नऊ.— कौटुंबिक न्यायालय, कायदा १९८४ (१९८४ चा ६६) कलम ३ मधील पोट-कलम (१) आणि (२) द्वारे प्राप्त करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून आणि यासंबंधी आतापर्यंत काढण्यात आलेल्या सर्व शासकीय अधिसूचना ज्या कौटुंबिक न्यायालय, नांदेड यांचे न्यायालयांशी जेथवर संबंधित असतील तेथवर त्यामध्ये फेरबदल करून महाराष्ट्र शासन, मुंबई येथील उच्च न्यायालयाशी विचार विनियम करून दिनांक २९ मार्च २०१४ पासून नांदेड जिल्हा नांदेड येथे कौटुंबिक न्यायालयाची स्थापना करीत आहे.

या न्यायालयाच्या अधिकारतेच्या स्थानिक मर्यादा नांदेड-वाघाळा महानगरपालिका क्षेत्राच्या मर्यादेशी समकक्ष असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सु. सो. शिंदे,
विधी सल्लागार-नि-सहसचिव.

LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated 28th March 2014.

NOTIFICATION

THE FAMILY COURTS ACT, 1984.

No. FCC. 1114/C.R. 44/D-IX.—In exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (2 of Section 3 of the Family Courts Act, 1984 (66 of 1984) and of all other powers enabling in thi behalf, the Government of Maharashtra, in consulation with the High Court of Judicature a Bombay, with effect from the 29th day of March 2014 hereby establishes a Family Court at Nande and specifies the area within the local limits of Municipal Corporation of the City of Nanded Waghala, for the purpose of exercising the jurisdiction and powers conferred by the said Act.

IndiaCode

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. S. SHINDE,
Legal Advisor-*cum*-Joint Secretary.